**महाराष्ट्र शासन**

**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई**

**चर्नीरोड रेल्वे स्टेशनजवळ, नेताजी सुभाष रोड, मुंबई ४०० ००४.**

**जाहिरात क्रमांक-००३/२०१५**

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१२/प्र.क्र.१८६/१२, दिनांक २५-७-२०१२ व समक्रमांकाचे दिनांक २८-२-२०१३ अन्वये या आस्थापनेवरील रिक्त पदे भरावयाची असून त्यासाठी मागासवर्गीय /खुला प्रवर्गातील इच्छुक व पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. भरावयाच्या पदांचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

**सरळसेवेची घोषित पदे**

| अ. क्र | पदाचे नाव | एकूण पदे | समांतर आरक्षण | अ.जाती | अ.जमाती | वि.जा.अ | भ. ज. ब | भ ज.क | भ. ज.ड | वि मा. प्र. | इ. मा.व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पहारेकरी | **१३** | सर्वसाधारण | १ | १ | १ | ० | १ | ० | ० | २ | ३ |
| | वे.बॅ.रु.४४४०-७४४० | | माजी सैनिक | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| | ग्रे.वे.१३००/- | | महिला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |

**२. शैक्षणिक अर्हता/अनुभव** (अर्ज करतेवेळी उमेदवारांने खालीलप्रमाणे धारण केलेली असणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.)

१. **पहारेकरी :-** इयत्ता ४ थी उत्तीर्ण, सुदृढ शरीरयष्टी.

**३. वयोमर्यादा :-**

३.१. उमेदवाराचे वय दिनांक ०१.०३.२०१५ रोजी १८ वर्षे पूर्ण, खुल्या प्रवर्गासाठी कमाल ३३ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल ३८ वर्षे असे राहील.

३.२. माजी सैनिकांसाठी सशस्त्र दलात ६ महिने सेवा केलेल्या माजी सैनिकामधील, त्यांनी सशस्त्र दलात केलेला अखंड कालावधी अधिक तीन वर्ष एवढा कालावधी त्यांचा विहित दिनांकाच्या वयातून वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल.

३.३. (१) स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशीत पाल्य (२) सन १९९१ चे जनगणना कर्मचारी (३) सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी (४) शासकीय सेवेतील कर्मचारी (५) प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त उमेदवार इत्यादींसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहतील.

३.४. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षांकरीता शिथिल करता येईल.

३.५. अंशकालीन कर्मचारी उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील.

(वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णयाच्या अधीन राहून कमाल वयोमर्यादा शिथिलक्षम असेल.)

**टीप :-**

**१. भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.**

**२. पदांची संख्या, प्रवर्गनिहाय पदसंख्या, परीक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे, रद्द करणे, अशंतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष, गट ड निवड समिती यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.**

३. सदर भरतीच्या नियम/निकषांमध्ये भरती पूर्ण होईपर्यंत शासन अधिसूचना/निर्णय/परिपत्रक/पत्रानुसार बदल झाल्यास त्या-त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. ती सर्वांवर बंधनकारक राहील.

४. उमेदवारांची लेखी परीक्षा तथा मुलाखतीचा दिनांक निश्चीत झाल्यानंतर त्याबाबत प्रवेशपत्राद्वारे कळविण्यात येईल.

५. भरती प्रक्रिया/जाहिराती संदर्भात काही बदल किंवा शुध्दिपत्रक काढणे इ. बाबतचे अंतिम निर्णय अध्यक्ष तथा व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांचे राहतील. याबाबत उमेदवारांना कळविण्यासाठी प्रसिध्द माध्यमाद्वारे व शासनाच्या संकेतस्थळाद्वारे प्रसिध्द केले जातील.

**४. अर्ज करावयाची पध्दत :-**

४.१. उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज ए-४ आकारात पांढ-या जाड कागदावर सादर करावा. त्यावर पासपोर्ट आकाराच्या अलिकडच्या काळातील स्वतःचा फोटो स्वतःची स्वाक्षरी करून अर्जावर चिकटवावा. टपालाने अर्ज पाठविताना भारतीय टपाल सेवेमार्फत पाठवावा. अर्ज बंद केल्यावर लिफाफ्यावर स्वतःचे पूर्ण नाव, अर्ज केलेल्या पदाचे नाव ठळक अक्षरात लिहून रेखांकित करावे.

४.२. भरलेला अर्ज **व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड रेल्वे स्टेशनजवळ, नेताजी सुभाष रोड, मुंबई ४०० ००४** या पत्त्यावर दिलेल्या अंतिम तारीख व वेळेच्या आत पोहचतील या बेताने डाकेने पाठवावेत किंवा कार्यालयीन वेळेत हस्तपोच जमा करावेत.

४.३. **अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख ३१.०३.२०१५ असून त्यादिवशी सायांकाळी ४.३० पर्यंत अर्ज स्विकारले जातील. त्यानंतर प्राप्त झालेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. पोष्टाने झालेल्या विलंबास हे कार्यालय जबाबदार असणार नाही व त्यासंबंधी कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदरचे अर्ज अपात्र ठरविले जातील.**

४.४. उमेदवाराने विहित नमुन्यामधील अर्जातील सर्व रकाने भरणे आवश्यक आहे. जी बाब अर्जदारास लागू होत नसेल तेथे **लागू नाही** असे नमूद करावे. अर्जदाराने त्याचा प्रवर्ग न चुकता नमुद करावा. अर्जदाराने अर्जात जो प्रवर्ग नमूद केला असेल त्याच प्रवर्गाकरता अर्जदाराचा विचार होईल.

**५. अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-**

उमेदवाराने अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या सुस्पष्ट दिसतील अशा प्रमाणित केलेल्या सत्यप्रती (Attested) जोडणे आवश्यक आहे. केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्तर, मुख्याध्यापक तसेच विशेष प्राधिकृत प्राधिका-याने प्रमाणित केलेल्या दाखल्याच्या सत्य प्रती ग्राह्य धरल्या जातील. मुळ प्रमाणपत्रे अथवा गुणपत्रके अर्जासोबत जोडू नयेत.

५.१. शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे/गुणपत्रके.

५.२. जन्मदिनांकासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेने दिलेला जन्म नोंद दाखला/शालांत परीक्षा प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला.

..३..

५.३. आरक्षित मागासप्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिका-यांनी दिलेले जात प्रमाणपत्र व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

५.४. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ब,दिनांक १२-१२-२०११ मधील तरतूदीनुसार याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचीकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२५-०८-२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधिन राहून तात्पुरता नियुक्ती आदेश निर्गमित केल्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अन्यथा त्यांची नियुक्ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

५.५. वि.जा.(अ), भ.ज. (ब), भ.ज. (क), भ.ज. (ड), वि.मा.प्र., इमाव व खुला (महिला) या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणा-या उमेदवारांसाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिका-यांने दिलेले दिनांक ३१-०३-२०१५ अखेर वैध असलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत सादर केली तरच त्यांना संबंधित आरक्षणाचा लाभ दिला जाईल, अन्यथा दिला जाणार नाही.

५.६. शासन निर्णय क्रमांक रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१०, दि. २७ जून २०११ नुसार ज्या परीक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

५.७. परीक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास त्या परीक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतू सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परीक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणातदेखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता राहणार नाही.

५.८. उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परीक्षार्थीसाठी लागू राहतील. इतर परीक्षार्थी/उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र आवश्यक राहील.

५.९. **माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक कल्याण बोर्डात नांव नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.**

**६. इतर महत्वाच्या सूचना :-**

६.१. सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०१०/१२, दि.२८-०३-२००५ व शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक ०१-०७-२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये दि.२८-०३-२००५ नुसार रोजी हयात असलेल्या व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या याबाबत लहान कुटूंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र, सादर करणे आवश्यक आहे. तसेच, **अविवाहित असणा-या उमेदवारानेही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.**

६.२. उमेदवारांना लेखी परिक्षेस तसेच मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. उपस्थित राहिल्याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भाडे अथवा भत्ता देय राहणार नाही.

६.३. निवड समिती अध्यक्ष, सदस्य किंवा अधिकारी यांच्यावर निवडी संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

..४..

६.४. पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये.

६.५. नियुक्त झालेल्या कर्मचा-यांसाठी शासन निर्णय वित्त विभाग अनियो/१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ अन्वये नवीन परिभाषिक अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

६.६. भरती प्रक्रियेदरम्यान जर एखाद्या उमेदवाराने सादर केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अशा उमेदवाराचा अर्ज भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात अपात्र ठरविण्यात येईल. अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास संबंधीत उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील व भा.दं.वि. संहिताचे कलम १९९ व २०० (२) प्रमाणे कारवाईस पात्र राहील.

६.७. जाहिरातीत दर्शविण्यात आलेली अर्हता ही किमान अर्हता आहे. ही किमान अर्हता हाच निकष मानून उमेदवार संबंधित पदाच्या निवडीसाठी पात्र ठरू शकणार नाही.

६.८. निवड झालेले उमेदवार सेवेत रूजू झाल्यानंतर त्यांना मूळ वेतनाव्यतिरिक्त महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व इतर भत्ते शासकीय नियमाप्रमाणे मिळतील.

६.९. निवड झालेल्या उमेदवारांची सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अस्थायी नेमणूक केली जाईल. या कालावधीतील त्यांचे काम, वर्तणूक व उपस्थिती समाधानकारक असल्यास सेवेत नियमित केले जाईल.

६.१०. नियुक्त झालेल्या उमेदवारास कार्यालयाच्या आस्थापनेवर कोणत्याही पाळी (SHIFT) मध्ये काम करावे लागेल.

६.११. जाहिरातीतील पदांच्या भरती प्रक्रियेबाबत प्रशासनाचा निर्णय अंतिम असून त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार वैयक्तीक पातळीवर कोणाशीही केला जाणार नाही.

६.१२. उमेदवाराने अर्जावर चिकटवलेल्या फोटो व्यतिरिक्त अर्जा सोबत स्वतःचा पासपोर्ट आकाराचा एक फोटो अर्जास स्टेपल करून जोडणे आवश्यक आहे. त्याा फोटोच्या मागे उमेदवाराने नाव पत्ता नमूद करावा तसेच उमेदवाराने अर्जासोबत स्वतःच्या संपूर्ण पत्ता पिनकोडसह लिहिलेला व रु.५ /- चे तिकीट लावलेला पोस्टाचा लिफाफा पाठवावा.

६.१३. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परिक्षेला बोलवण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही याची नोंद घ्यावी.

६.१४. सदर जाहिरात ही www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल.

६.१५. शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांचा अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावेत. सदर परवानगी अर्ज सादर करण्यापुर्वीची असणे आवश्यक आहे.

६.१६. माध्यमिक शालांत परीक्षेत मराठी/ हिंदी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी/ हिंदी भाषा परीक्षा विहित कालावधीत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**७. परीक्षेचे स्वरूप**

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१२/०४/बारा, दिनांक ७ जून २००४ नुसार खालील पदांसाठी घेण्यात येणारी लेखी परिक्षा / मुलाखतीचे गुण खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | पदनाम | लेखी परिक्षेचे गुण | मुलाखती गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| १ | पहारेकरी | ७५ | २५ | १०० |

**टिप :-**

७.१ लेखी परीक्षेला मराठी,इंग्रजी, सामान्यज्ञान व गणित या विषयांवर वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न असतील.

७.२. एकाच स्थानासाठी दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि.२७-०६-२००८ मधील निर्णयामध्ये नमुद केल्यानुसार प्राधान्यक्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

७.३. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३/-अ, दिनांक १९ ऑक्टोबर, २००७ च्या शासन निर्णयात निश्चित केलेल्या प्रमाणकानुसार वर नमूद केलेल्या संवर्गातील भरावयाच्या पदांबाबतीत लेखी परिक्षेतील गुण विचारात घेवून पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी/मौखीक परीक्षेसाठी बोलविण्यात येईल.

७.४. लेखी परीक्षेत उमेदवारांना मिळालेल्या गुणानुक्रमानुसार मुलाखतीसाठी बोलविण्यात येणा-या उमेदवारांची संख्या खाली नमूद केल्याप्रमाणे राहील.

| <u>रिक्त पदांची संख्या</u> | <u>मुलाखतीसाठी बोलविण्याच्या उमेदवारांची संख्या</u> |
|---|---|
| i) ५ पदांपर्यंत | रिक्त पदांच्या संख्येच्या ५ पटीत मात्र उमेदवारांच्या १५ इतक्या संख्येपर्यंत मर्यादित. |
| ii) ६ व त्याहून अधिक | ३ पटीत |

७.५. वर नमूद केलेल्या पदांसाठी असलेल्या मौखिक परीक्षेस उमेदवार गैरहजर राहील्यास उमेदवाराची निवड करण्यात येणार नाही.

**८) खालील उणिवा असलेले अर्ज अपात्र ठरविण्यात येतील. :-**

८.१. विहित नमुन्यातील नसलेले अर्ज.

८.२. फोटोवर स्वाक्षरी नसलेले व अर्जावर उमेदवारांची स्वाक्षरी नसलेले अर्ज.

८.३. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज.

८.४. विहित पात्रता पूर्ण न करणा-या उमेदवारांचे अर्ज.

८.५. मजकूर अपूर्ण किंवा चुकीचा भरलेले अर्ज.

८.६. आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणित सत्यप्रती न जोडलेले अर्ज.

८.७. लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र स्वाक्षरी नसलेले.

**अध्यक्ष,**
प्रादेशीक निवड समिती तथा
**व्यवस्थापक**

## अर्जाचा नमुना

| फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता | |
|---|---|
| अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक | |
| जातीचा प्रवर्ग | |

ज्या पदासाठी अर्ज केलेला

आहे त्या पदाचे नांव व प्रवर्ग :-

उमेदवाराचा अलीकडे काढलेला स्वसाक्षांकित फोटो.

प्रति,

**व्यवस्थापक,**
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,
चर्नीरोड स्टेशन जवळ
नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.

आपले कार्यालयाची जाहीरात दिनांक / /२०१५ ला अनुसरुन **पहारेकरी** या पदासाठी अर्ज करिता असून माझा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. उमेदवाराचे संपूर्ण नांव (मराठीमध्ये) :-

| आडनाव | स्वत:चे नाव | वडिलांचे नाव |
|---|---|---|
| | | |

२. लिंग (पुरुष/स्त्री) :-

३. आईचे नाव :-

४. जन्मतारीख :-

५. वय (दि.०१/०१/२०१५ रोजी) :- वर्ष:- महिने :- दिवस:-

६. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :- ------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------

संपर्कासाठी दूरध्वनी क्रमांक :- --------------------------------------------------
अथवा भ्रमणदूरध्वनी क्रमांक :- ---------------------------------------------------

असल्यास ईमेल आयडी क्र. :- ---------------------------------------------------

७. (अ) जात ----------------------------- जातीचा प्रवर्ग ----------------------------------------

(ब) जातीचा पवर्ग (योग्य तेथे √ अशी खूण करावी.)

| अनु.जाती | अनु.जमाती | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

८. अर्ज कोणत्या जातीच्या प्रवर्गासाठी केला आहे. ---------------------------------------------------

(प्रवर्ग स्पष्ट अक्षरात नमूद करावा)

(उमेदवार इ.मा.व., वि.जा.(अ), भ.ज. (ब), भ.ज.(क) भ.ज.(ड) खुला (महिला) आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या या प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची प्रमाणित सत्यप्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक)

९. अर्जदार विवाहित/अविवाहित √ अशी खूण करावी

| विवाहित | अविवाहित |
|---|---|
| | |

१०. राष्ट्रीयत्त्व :-

११. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी आहे काय? (होय/नाही)

१२. अ) अर्जदार माजी सैनिक आहे काय? (होय/नाही)
ब) अर्जदार प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त आहे काय? (होय/नाही)
क) अर्जदार अंशकालीन आहे काय? (होय/नाही)

१३. अर्जदार समांतर आरक्षणातील असल्यास त्याचा प्रकार :- --------------------------------------
व सोबत प्रमाणपत्र जोडले आहे काय? (होय/नाही)

१४. शैक्षणिक/तांत्रिक पात्रता

| शैक्षणिक पात्रता | मंडळ / विद्यापिठ | उत्तीर्ण वर्ष | विषय | गुणांची टक्केवारी | अर्जासोबत सत्यप्रत जोडली असल्यास √ अशी खूण करावी. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१५. अनुभव

| अ.क्र. | काम केलेली संस्था व तीचा पत्ता | कामाचा कालावधी पासून | पर्यंत | पदाचे नांव व वेतनश्रेणी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

१६. नोकरीसाठी शासनाचे अधिकृत कार्यालयाकडे नोंदणी क्रमांक -------------------------------------

**-: प्रतिज्ञापत्र :-**

मी असे प्रमाणित करतो / करते की प्रस्तुत पदाची जाहिरात / अधिसूचना वाचली असून त्यातील पदविषयक माहिती मी काळजीपूर्वक वाचली आहे, व मला ती मान्य आहे. सदर परीक्षेस प्रवेश मिळण्यासाठी अधिसूचनेत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीची मी पूर्तता करतो / करते याची मी खात्री केली आहे. या अर्जात दिलेली माहिती माझ्या माहिती प्रमाणे बरोबर व खरी आहे. तसेच अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास त्याच माहितीच्या आधारे मला दिलला प्रवेश रद्द होईल आणि मिळालेली नोकरी गमावण्यास मी बांधील राहीन व पुढील योग्य त्या कारवाईस पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

स्थळ :- उमेदवाराची स्वाक्षरी

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ नुसार**
**अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटुंबाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना अ (नियम ४)**

# प्रतिज्ञापत्र

मी, श्री./श्रीमती ------------------------------------------------------- श्री. ----------------- --------------------- यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय ------- वर्ष राहणार ---------------------- ------------------------------------------------------------ याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१. मी **पहारेकरी** या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२. आज रोजी मला ------------ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दि.२८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या -------- आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा.)

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा जास्त असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे.

दिनांक :-

ठिकाण :- ( उमेदवाराची स्वाक्षरी )